# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्रं. - ४८४अ

विभाग - अग्निशमन व आपत्कालीन सेवा
दिनांक - १६/०८/2024

कामाचे नाव- जिल्हा वार्षीक योजना निधीतुन भिवंडी महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या सक्षमीकरणांकरिता विविध प्रकारचे अग्निशमन वाहने खरेदीकरणेकामी निधी उपलब्ध करुन मिळणेबाबत.

प्रस्ताव :-

भिवंडी शहराचा भौगोलीक परिस्थितीचा विचार करता तसेच असलेले उदयोग धंदे जसे पावरलुम, डाईंग, मनी कारखाने व इतर छोटेमोठे उदयोगधंदे यांचा विचार करता तसेच भिवंडी मनपाहद्दीत असलेल्या होत असलेल्या उंच इमारती यांचा विचार करता तसेच भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीलगत असलेल्या ग्रामीण भागामध्ये असलेल्या रसायनांचे गोडावुन, कारखाने, कंपनी, व निरनिराळया प्रकारचे उद्योग धंदे व्यवसायांना आगीसारखी किंवा इतर दुर्घटना घडल्यास त्या परिसरात अग्निशमन सेवा उपलब्ध नसल्याने भिवंडी मनपा अग्निशमन दलाला सेवा पुरवावी लागते.भिवंडी मनपा अग्निशमन विभागाचे तीन अग्निशमन केंद्र व एक मुख्य अग्निशमन कार्यालय असे चार अग्निशमन केंद्र असुन दोन नविन अग्निशमन केंद्र प्रस्तावित आहेत.

अग्निशमन विभागाकडे सद्य स्थितीत असलेल्या तीन फायर टेंडरची पाण्याच्या टाकीची क्षमता हि ५००० लिटर आहे तर तीन क्विक रिस्पोन्स व्हेहिकल मध्ये मीस्ट वॉटर टेक्नॉलॉजी आहे त्यामध्ये फक्त ५०० लीटर पाणी आहे व मागील वर्षात दोन वॉटर ब्राउझर खरेदी करण्यात आलेले असुन त्याची क्षमता हि १४००० लीटर आहे व सदरचे दोन्ही फायर वॉटर ब्राउझर हे दोन अग्निशमन केंद्रामध्ये देण्यात आलेले आहे ०३ फायर बाईक,०१ फायरजीप उपलब्ध आहेत. भिवंडी मनपा कार्यक्षेत्रात तसेच कार्यक्षेत्राबाहेर आगीच्या वर्दीवर काम करतांना काही भागामध्ये रोडच्या आत मध्ये असलेल्या लोकवस्तीमध्ये फायर टेंडर पोहचु शकत नाही अशा ठिकाणी मोठया प्रमाणावर होज पाईप वापरुन सदरची आग विझवावी लागते. अशा ठिकाणी काम करण्याकरिता मीनी वॉटर टेंडर उपलब्ध असल्यास सदर मीनी फायर टेंडर घटनास्थळापर्यंत पोहचेल व सदर आग विझविणेकामीचे काम सोपे व कार्यक्षमतेने होईल. त्याचबरोबर भिवंडी मनपा कार्यक्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर कापड उदयोग आहे व त्यामध्ये लुम कारखाने, सायजिंग व डाईंग मध्ये कपडा व कपडा बनविण्याकरिता लागणारे कच्चा माल वापरण्यात येतो व सदर मालाला आग लागल्यास मोठया प्रमाणावर पाण्याची आवश्यकता लागते तसेच दाट लोकवस्ती असल्याने सदरची आग पसरु नये या करिता सदर आगीवर लवकरात लवकर नियंत्रण मिळविणेकरिता चारही बाजुने आग नियंत्रित करण्याकरिता अधिकच्या फायर टेंडर व पाण्याची आवश्यकता असते.

त्याचबरोबर भिवंडी मनपा कार्यक्षेत्राबाहेर ग्रामपंचायत हद्रदीमध्ये मोठया प्रमाणावर गोदामे आहेत यामध्ये सदर गोदामे हि आकाराने खुप मोठी आहेत जवळपास ५०,००० ते १,००,००० चौ.फुट कधी कधी त्याहुन मोठी सुध्दा आहेत व त्यामध्ये मोठया प्रमाणावर इंपोर्ट व एक्सपोर्टचे सामान ठेवलेले असते त्याचबरोबर ऑनलाईन डिलेव्हरी देणारे ॲमेझॉन, मिशो, फिल्पकार्ट इ. सारख्या कंपण्याचे सुध्दा मोठया प्रमाणावर गोदामे आहेत व त्यामध्ये मोठया प्रमाणावर माल साठवणुक केलेली असते.सदर गोदामांमध्ये लागलेल्या आगीवर लवकरात लवकर नियंत्रण मिळविणेकरिता चारही बाजुने आग नियंत्रित करण्याकरिता अधिकच्या फायर टेंडर व पाण्याची आवश्यकता असते.

भिवंडी मनपा कार्यक्षेत्रात तसेच कार्यक्षेत्राबाहेर आगीच्या वर्दीवर काम करतांना मोठया प्रमाणावर पाण्याची आवश्यकता असते भिवंडी मनपा कार्यक्षेत्रात तसेच कार्यक्षेत्राबाहेर आग

विझविणेकरिता पाणी घेण्याचे एकमेव ठिकाण हे भिवंडी वॉटर सप्लाय, कामतघर या ठिकाणी आहे. आगीच्या वर्दीवर फायर टेंडर मधील पाणी संपल्यानंतर वॉटर सप्लाय येथे पाणी भरुन येण्याकरिता भिवंडी व आसपास मध्ये सुद्धा मोठया प्रमाणावर असलेल्या ट्राफीकच्या समस्येमुळे मोठया प्रमाणावर अडथळा निर्माण होतो. पाणी भरुन आणेपर्यंत आग पुन्हा भडकलेली असते तसेच काही वेळा सदरची आग हि आजुबाजुला पसरण्याचे प्रकार सुध्दा होतात व त्यामुळे मोठया प्रमाणावर आर्थीक नुकसान होते तसेच घटनास्थळी उपस्थित नागरिकांच्या व लोकप्रतिनिधींच्या रोषाला सामोरे जावे लागते.

**वरिल वेगवेगळया प्रकारच्या आगीच्या वर्दीवर काम करण्याकरिता अग्निशमन विभागाकडे सदय स्थितीत कार्यरत असलेल्या व प्रस्तावित अग्निशमन केंद्रामध्ये मिनी फायर टेंडर, फायर टेंडर व वॉटर ब्राउझर असणे आवश्यक आहे.**

भिवंडी मनपा कार्यक्षेत्रात असलेले इतर उदयोगधंदे जसे मोती कारखाने यामध्ये वेगवेगळया प्रकारचे केमीकल प्रोसेसिंग करिता वापरले जातात तसेच यार्न डाईंगमध्ये सुद्धा कलर केमीकल चा वापर होतो, भिवंडी शहर लगत असलेल्या गोडावुन मध्ये वेगवेगळया प्रकारचे केमीकल ठेवले जातात तसेच भिवडी पासुन जाणा-या मुंबई-आग्रा हायवे, वसई रोड तसेच इतर रोड यावर सुद्धा विविध प्रकारच्या केमीकलची वाहतुक हि करण्यात येते. याठिकाणी आगीसारखी दुर्घटना घडल्यास आग विझविणेकामी अग्निशमन विभागाकडे पाणी व फोम तो पण २० लीटरच्या ड्रम मध्ये उपलब्ध आहे. फोमचा वापर करतांना २० लीटरचे ड्रम हे बदलत फोम ब्रँचच्या साहाय्याने त्याचा वापर केला जातो. ड्रम बदलत फोमचा वापर केल्याने त्यांमध्ये खंड पडतो तसेच आगीच्या जवळ जावुन फोम ब्रँचचा वापर करावा लागत असल्याने अग्निशमन अधिकारी व कर्मचारी यांच्या जीवीताला धोका संभवतो. काही वेळा काही केमीकल जसे हायड्रो केमीकल यावर पाण्याचा वापर केल्यास त्याठिकाणी आग विझण्याऐवजी स्पोट होतात. अशा वेळी अग्निशमन विभागाकडे आग विझविण्यास मदत करणारे फोम टेडर उपलब्ध नाही.

**वरिल आगीच्या वर्दीवर काम करण्याकरिता अग्निशमन विभागाकडे फोम टेंडर सारखे अग्निशमन वाहन असणे आवश्यक आहे.**

इमारत दुर्घटना अथवा तसेच लॅड स्लाईडिंग व रोड दुर्घटना घडल्यास सदर रेस्क्यु वर्दीच्या ठिकाणी नागरिकांचे जीव वाचविण्याकरिता अधिक जलद गतीने काम करावे लागते वेळेत व कुशलतेने काम करुन रेस्क्यु केल्यास नागरिकांचे जीव वाचविले जातात. अशा वेगवेगळया प्रकारच्या रेस्क्यु वर्दीवर जलद गतीने काम करण्याकरिता अग्निशमन विभागाला अत्याधुनिक व वेगवेगळया प्रकारच्या लहान मोठया प्रकारच्या रेस्क्यु साधन सामुग्रीची आवश्यकता असते. भिवंडी अग्निशमन विभागाकडे सदय स्थितीत काही प्रमाणात अत्याधुनिक साधन सामुग्री ज्यामध्ये ०१ एक हायड्रोलीक स्पेडर कटर किट, बॅटरी ऑपरेडेट स्प्रेडर कटर, इ.परंतु सदर साधन सामुग्री खुपच कमी प्रमाणात आहे. त्यामुळे रेस्क्यु वर्दीवर काम करतांना मोठया प्रमाणावर अडथळे निर्माण होतात व वेळेत नागरिकांना रेस्क्यु करता येत नाही.

**वरिल प्रकारच्या रेस्क्यु वर्दीवर काम करण्याकरिता अग्निशमन विभागाकडे अत्याधुनिक सर्व प्रकारच्या रेस्क्युवर्दीवर काम करण्याकरिता आवश्यक असलेल्या साधनसामुग्रीसह असलेली अॅडव्हॉन्स रेस्क्यु व्हॅन असणे आवश्यक आहे.**

वरिल बांबीचा विचार करता वेगवेगळया प्रकारच्या आगीच्या व रेस्कयुवर्दीवर वेळेत व कार्यक्षमपणे काम करुन नागरिकांच्या जीवीताचे तसेच राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होण्यापासुन वाचविण्याकरिता अग्निशमन विभागाच्या सक्षमीकरणांकरिता मिनी फायर टेंडर, फायर टेंडर, वॉटर ब्राउझर, फोम टेंडर व अॅडव्हॉन्स रेस्क्यु टेंडर या सारख्या वाहनांची आवश्यकता आहे व सदर अग्निशमन वाहने खरेदी करणेकामी मनपाच्या नोटीस बोर्डवर व वर्तमानपत्रामध्ये जाहिर अवाहन करुन बाजारभाव मागविण्यात आलेले होते व त्यानुसार अग्निशमन विभागाला एकुण आवश्यक वाहने खरेदी करण्याकरिता अंदाजित एकुण खर्च खालील प्रमाणे.

| अ.क्रं | वाहनाचा प्रकार | प्रति नग किंमत (रु) | एकुण आवश्यक नग | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | मिनी फायर टेंडर – चेसिस ७ टन , इंजिन पॉवर- ९८ HP मिनिमम, पाण्याची टाकी -२००० लिटर, पंप- A) नॉरमल प्रेशर १८०० LPM@७ bar, B) हाय प्रेशर २५० LPM@२० bar | १,३०,१०,०००/- | ०५ | ६,५०,५०,०००/- |
| २. | फायर टेंडर- चेसिस १६ टन , इंजिन पॉवर- १७० HP मिनिमम, पाण्याची टाकी -४५०० लिटर, पंप- A) नॉरमल प्रेशर २००० LPM@८.५ bar, B) हाय प्रेशर ४०० LPM@४० bar | १,४५,२५,०००/- | ०५ | ७,२६,२५,०००/- |
| ३. | फोम टेंडर - चेसिस १८ टन , इंजिन पॉवर- १७५ HP मिनिमम, पाण्याची टाकी -५००० लिटर, फोम टाकी - ५०० लि. , पंप- A) नॉरमल प्रेशर २००० LPM@१० bar, B) हाय प्रेशर ४०० LPM@४० bar | २,५०,२०,०००/- | ०४ | १०,००,८०,०००/- |
| ४ | वॉटर ब्राउझर - चेसिस २८ टन , इंजिन पॉवर- १८० HP मिनिमम, पाण्याची टाकी -१४००० लिटर, पंप- A) नॉरमल प्रेशर ३००० LPM@१० bar, B) हाय प्रेशर ४०० LPM@४० bar | १,७५,६०,०००/- | ०१ | १,७५,६०,०००/- |
| ५ | रेस्क्यु टेंडर- चेसिस ४X२ , इंजिन पॉवर- १७० HP मिनिमम, विविध प्रकारचे रेस्क्यु साहित्य. | ६,७६,००,०००/- | ०१ | ६,७६,००,०००/- |
| | | | १६ | ३२,२९,१५,०००/- |

वरिल प्रमाणे अग्निशमन विभागाला आवश्यक असलेले १६ अग्निशमन वाहने खरेदी करण्याकरिता एकुण रु. **३२,२९,१५,०००/-** (अक्षरी- बत्तीस कोटी एकोनतीस लाख पंधरा हजार रुपए मात्र)(सर्व करांसहित) अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

तेव्हा जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२४-२५ मधुन अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणेकरिता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागास वरिल प्रमाणे वाहन खरेदीसाठी रक्कम रु. **३२,२९,१५,०००/-** अनुदान मागणी प्रस्ताव आर्थिक व प्रशासकिय मानेतेस्तव सविनय सादर,

ठराव निर्णय – ४८४अ

अग्निशमन विभागाला आवश्यक असलेले १६ अग्निशमन वाहने खरेदी करण्याकरिता एकुण रु. ३२,२९,१५,०००/- जिल्हा वार्षीक सर्वसाधारण योजना सन २०२४-२५ मधुन अग्निशमन सेवेचे बळकटीकरण करणे करिता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागास वरिल प्रमाणेचे वाहन खरेदीसाठी रक्कम रु. ३२,२९,१५,०००/- अनुदान मागणी प्रस्ताव पाठविणेस मान्यता देण्यात येते.

(अजय वैद्य)
प्रशासक
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

O/C